|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

**बातमी - 1**

धुळे 28 (प्रतिनिधी) कला जोपासतांना आपल्या सामाजिक जबाबदारीचेही भान असले पाहिजे कारण समाजाला दिशा देण्यासाठी कलावंत व साहित्यिकांचे योगदान मोलाचे असते असे प्रतिपादन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि श्री. शिवाजी विद्याप्रसारक संस्थेचे कला, साहित्य व वाणिज्य महाविद्यालय,धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवक महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी केले.

महोत्सवाचे उद्‌घाटन महाविद्यालयाच्या प्रांगणात जल्लोषात झाले. यावेळी मंचावर व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, निरीक्षक प्रा.सत्यजित साळवे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.संजय पाटील, प्रफुल्ल शिसोदे, प्रमोद पाटील, प्रा.विलास चव्हाण, अधिसभा सदस्य नितीन ठाकूर, मोहन पावरा, प्रा.मनोहर पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी अश्विनी पाटील, जनसंपर्क अधिकारी सुनील पाटील आदी उपस्थित होते. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील पुढे म्हणाले की, युवारंग युवक महोत्सवाबाबत विद्यार्थ्यांच्या काही सूचना आल्यात. केंद्रीय युवक महोत्सवात दोन ते अडीच हजार विद्यार्थ्यांना सांभाळताना मोठ्या प्रमाणात आयोजकांची अडचण होते तसेच मुलींना देखील पाच दिवस पालक सोडत नव्हते परंतू आता सकाळी गेलेली आपली मुलगी संध्याकाळी परत येते त्यामुळे महोत्सवाचा उत्साह दुणावला आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ.संजय पाटील म्हणाले की, हा दिवस तुमचा आहे. पूर्ण जोश मध्ये मजा करा पण होश कायम ठेवा. एस.एस.व्ही.पी.एस संस्थेला संस्कृतीक कार्यक्रमाची मोठी परंपरा असल्याचेही यावेळी ते म्हटले.

धुळे विभाग युवक महोत्सवाचे समन्वयक डॉ.अश्फाक शिकलगर यांनी सुत्रसंचालन केले तर प्रा.शशिकांत बोरसे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

**---------------------**

**बातमी - 2**

जळगाव दि. ( ) व्यक्तीमधील संभाषण, विचारशैली, ज्ञान वागणूक, आवाज, ऐकण्याचे कौशल्य, संभाषण कौशल्य, चेह-यावरील हावभाव अशा अनेक गोष्टीवर प्रभुत्व मिळवून स्वतःचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते असे प्रतिपादन श्रीमती सकिना लेहरी यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत युवतींसाठी आयोजित व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेप्रसंगी केले.

कार्यशाळेचे उद्‌घाटन व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा.डॉ.सीमा जोशी यांचे हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर ॲड.महिमा मिश्रा, सौ. भाग्यश्री शर्मा, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सिमा पाटील,डॉ. पवित्रा पाटील उपस्थित होत्या.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

अ‍ॅड. महिमा मिश्रा यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, आपण करीत असलेल्या कामात शंभर टक्के योगदान द्यायलाच पाहिजे यासोबतच स्त्रियांचा आदर, स्वतःला कमी लेखणे, मानवी मुल्ये, मानवी अधिकार, स्त्री-भृणहत्या, अशा विविध विषयावर त्यांनी विचार मांडले. सौ.शर्मा यांनी स्वतःच्या स्वप्नांना चालना द्या. इच्छा, आकांक्षांना बळ द्या. आव्हाने स्विकारुन स्वतःची समाजात ओळख बनवा. व्यवस्थापनात येणाऱ्या विविध अडचणी, प्रश्न सोडवून स्वतःवर संयम ठेवणे खुप महत्वाचे असल्याचे सांगितले. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सिमा पाटील यांनी स्त्रियांच्या विविध शारीरिक आणि मानसिक समस्यावर मार्गदर्शन करताना मासिक पाळी वेळेवर न येण्याची कारणे तसेच स्त्रीयांच्या जिवनातील विविध शारिरीक व मानसीक समस्या मांडल्या, पौष्टीक आहार, फिटनेस अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. उद्‌घाटन भाषणात प्रा.डॉ.सीमा जोशी यांनी युवतींना स्वसंरक्षण, आत्मविश्वास व स्वयंसिध्द समृध्दजीवन कसे जगावे या विषयी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत विद्यापीठातील विविध प्रशाळेतील विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.कार्यशाळेचे सुत्रसंचालन विद्यार्थीनी वनमाला पाटील हिने केले, निलम पाटील हिने आभार मानले.

---

उमवि/16/ हस्तदेय/ 2018 दिनांक : 31 जानेवारी, 2018

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी